# ‘जयदेव’

... CENTRE FOR FUNDAMENTAL RESEARCH IN INDIAN CULTURE
ESTD. 198.

श्री श्रीराम कृष्ण पंडित यांस
श्री. रा. रा. ........................................
यांज कडून सप्रेम भेट. दिनांक ......................

" जीवन–कल्याण "

दि कोल्हापूर शुगर मिल्स लि., कोल्हापूर तर्फे



पूज्य **गोविंदरावजी** यांच्या पुण्यस्मृतीस
जीवन–कल्याणच्या रौप्यमहोत्सवी वर्षाप्रित्यर्थ सादर आदरांजली, १९७७.

# निवेदन

कै. गोविंदरावजी टेंबे यांनी लिहिलेली 'जयदेव' ही संगीतिका प्रसिद्ध करण्यास 'जीवन कल्याण' ह्या संस्थेस अत्यानंद होत आहे. या संस्थेचे अध्यक्ष श्री. मदनमोहन लोहिया यांचा आणि श्री.गोविंदरावजींचा घनिष्ट संबंध होता.'जयदेव' ही संगीतिका श्री गोविंदरावजींनी प्रथम लोहिया शेठजींनाच वाचून दाखविली होती, आणि तेंव्हापासून या संगीतिकेबद्दल श्री. लोहिया यांना आकर्षण वाटत होते. ही संगीतिका यशस्वीरीतीने रंगभूमीवर सादर करण्यात श्री.लोहिया यांचेच परिश्रम कारणीभूत झाले. 'जयदेव' ही संगीतिका प्रथम १९५४ साली आकाशवाणीवरून प्रसृत करण्यात आली होती. त्यानंतर कोल्हापूर येथील भगिनीमंडळाकरिता १९६२ साली याचा एक प्रयोग यशस्वीरीत्या करण्यात आला. त्यानंतर १९७३ साली आमच्या जीवनकल्याण संस्थेने ही संगीतिका जास्त वैभवात सादर केली. देवल क्लबच्या नाट्यविभागाने ही संगीतिका महाराष्ट्र राज्य संगीत नाट्यस्पर्धामध्ये भाग घेऊन यासाठी खास बक्षीस मिळविले.

श्री. गोविंदरावजींच्यासारखी, साहित्य, संगीत आणि नाट्य यामध्ये मान्यवर असलेली व्यक्ति विरळीच. अत्यंत मधुर व असामान्य असे हार्मोनियमवादन, रंगभूमीवरचे अत्यंत देखणे व समजुतदार असे पात्र, श्रेष्ठ साहित्यिकांनाही मान्य व्हावी अशी साहित्यरचना, कवींनाही मोह पडावा असे काव्य, अशा अनेक गुणांचा समावेश श्री. गोविंदरावजींच्यामध्ये होता. त्यामुळेच रसीकवर्य श्री. लोहिया यांची श्री. गोविंदरावजींचेवर भक्ति जडावी हे योग्यच होते. 'जयदेव' श्री. गोविंदरावजींची दुसरी संगीतिका प्रसिद्ध करून व तिचे प्रयोग करून, आपली श्री.गोविंदरावजींचेबद्दलची आदरभावनाच त्यांनी दर्शविली आहे असे मानावयास हरकत नाही.

श्री. गोविंदरावजी टेंबे यांच्या

संगीतिका

१ महाश्वेता

२ जयदेव

३ प्रतिमा

... FOR FUNDAMENTAL RESEARCH ...

## अंक १ ला

( जयदेव मंदीराच्या मंडपात दशावतार प्रशस्ती गात आहे. गाण्याची सुरवात ऐकून दोन देवदासी नर्तिका येतात. एक एका अवताराचे वर्णन ऐकून त्याप्रमाणे नृत्य करतात. सुरवातीस भक्तजनांची ये–जा चालू आहे. )

**जय.** :

हे जय जगदीश हरे ॥ धृ. ॥
मीनावतार प्रथम घेउनी, तनुनौकेतुनि निगम तारिले
जय जगदीश हरे ॥ १ ॥
कूर्मावतारी पृथ्वी वाहुनी, विशाल धरणीसी कण मानियले
जय जगदीश हरे ॥ २ ॥
चंद्र कलंका तेंवि धरेसी वराहरूपें दंतीं धरिले
जय जगदीश हरे ॥ ३ ॥
करांबुजांच्या नखांकुशानी नरहरिनें असुरा विदारिलें
जय जगदीश हरे ॥ ४ ॥
वामनरूपे पदारविंदे बलिसी पाताळीं मिळवियले
जय जगदीश हरे ॥ ५ ॥
अतिभय तापद मत्त क्षत्रियां चंड-परशु आयुधे खंडिले
जय जगदीश हरे ॥ ६ ॥
रामावतार सुरम्य घेउनि दशमुख दुष्टासी संहरिले
जय जगदीश हरे ॥ ७ ॥
कालिय मर्दुनि शामसुंदरे यमुनातट जन निर्भय केलें
जय जगदीश हरे ॥ ८ ॥
वेद विरोधी अति करुण परि, अहिंसा ब्रीद बुद्धे अवतरे
जय जगदीश हरे ॥ ९ ॥
धूमकेतुसम कृपाण-पाणी कल्कीरूपे म्लेंछ मर्दिले
जय जयदीश हरे ॥१०॥

( पद्मावती व विष्णुशर्मा प्रवेश करतात. )

**पद्मा.** :

काव्यसुधा वीणारव वाणी, मंत्रमूढ मति होत ऐकुनी ।
कोण असे हा कविवर गायक, आळवि विविध राग–रागिणी ॥

**जय.** :

दशावतार हे उदार हरिचें सार रूप जयदेवे कथिले ॥
हे जय जगदीश हरे ॥

**पद्मा.** :

ऐका, ऐका ! सावधानचित्त पिताजी

**विष्णु.** :

निकटी जाउनी पाहुया तरी कोण असे ही नवखी व्यक्ती !

**पद्मा.** :

व्यक्ति नव्हे, प्रभुची कलाकृति !

**विष्णु.** :

( जवळ जाऊन ) नमस्कार मम गानकुशल कविराजाला ।
(निरखून) आश्चर्य ! आश्चर्य महा ! काल रात्रीं दर्शन हेंचि घडले मजला ॥

**जय.** :

भ्रम झालासे आपुल्या मतिला । प्रहर न झाला येउनि मजला
जगन्नाथपुरिला ।

**विष्णु.** :

नुरली शंका, जगन्नाथ प्रभूने स्वप्नीं मज,
महाभाग हा दावियला । धन्य भाग्य मम !

**जय.** :

वृथा कल्पना कशासि असल्या भ्रांत चित्तसम । कोण आपण ?

**विष्णु.**

जगन्नाथ पद-पंकज सेवक, परंपरागत मी पुजारी ।
स्वप्नांतरिंहि मिथ्या वच मग कैसी जिव्हा मग उच्चारी ?

**जय.** :

मीच काय मग मिथ्याचारी !

**विष्णु.** :

कविराज, शांत मने परिसावी माझी करुण कहाणी क्लेशकारी ।
विष्णुशर्मा नाम माझें, असे माझी कन्यका ही ।
नाम पद्मावती हिचे मातृहीना उपजता ही ।
पोशिले अध्यापिले इस, पुत्र जेवि वीस वर्षे ।
रूप-यौवन हिचे आता मजवरी अंगार वर्षे ।



**जय.** :

अति कोमल सुकुमार कमलदल समिधासम कां इंधन होइल !
न घडे अनुचित कदापि ऐसे ॥

**विष्णु.** :

पाहुनि लावण्य हीचे लालसा मनिं निंद्य धरोनी
देवदासी करूं बघती मत्त देवस्थान श्रेष्ठी ।
सतत चिंता चितेमाजी जळत जाणुनि जगन्नाथे
घडविले आपुले दर्शन, पाहुनि मज परम कष्टी ।
करी अर्पण कन्यका निज कवि जयदेवाप्रती
जगन्नाथें स्वप्निं कथिले नको शंका धरुं चित्तिं ।
काव्य ऐकुनि खूण पटली, मूर्ति ही ओळखे दृष्टी ॥

**जय.** :

स्वप्निं साक्षात्कार प्रभूचा मजसि परि तो जाहला ना ।

**विष्णु.** :

अयाचित आगमन आपुले, हीच प्रभुची प्रेरणा ।
नामही प्रभुनेच कथिले नुरली शंका मुळिं मना ।
चरणिं ठेविं कन्यका, पुरवा न पुरवा कामना ।
( पद्मावतीस ) बाले, जगन्नाथ प्रभु कृपावंत तो मुक्त संकटातुनि केले ।
स्वये निवडुनि पति तुजसाठी कविवर जयदेवा दाविय‌ले,
प्रभुचा प्रसाद मानुनि मोदे कविचरणीं तुज अर्पियेले । ( श्रेष्ठी येतो )

**श्रेष्ठी.** :

नसे तुला अधिकार अर्पिण्या प्रभुपदार्पिता देवदासीतें
( जयदेवास ) कोण ? कुठुनि आलासी तू इथें ?
जा, झणिं इथुनि, ना तरि जाशिल यमसदनातें ।

**जय.** :

प्रभुच्या द्वारीं भक्त बैसला शांत असे अपराध कसला ।
किल्वबिंदुचा विप्र असे मी सोडुनि आलो निजधामाला ।
जयदेव कवी म्हणती मजला देवदर्शना आसुसलेला ॥

**श्रेष्ठी** :

आज रात्रीं रथ महोत्सव-शुभ मुहुर्तीं देवदासी विधियुता होईल ही
पद्मावती ।

**विष्णु.** :
नव्हे प्रभुची देवदासी-परी तुमची भोगदासी।

**जय.** :
कैंवि होईल देवदासी, जाया झाली मम आता ती।
जगन्नाथ साक्षीनें झाले कन्यादान तियेचे मज प्रती।

**श्रेष्ठी** :
प्रहर एक अवसर देतो मी, जगन्नाथ देवो सन्मतीते।
देवस्थान दूत ना तरी, बांधुनी नेतिल पद्मावतीतें। (जातो)

**विष्णु.** :
जगन्नाथ पदिं धरीन धरणें न्याय करिल कृपासागर तो
एकनिष्ठ सेवेचे देईल अनिष्ठ फल, कैसे तें बघतो॥ (जातो)

**जय.** :
जाइ बाले, करि विचार तूं शांत मनें या संकटाचा।
नको आंस धरूं मम संगतीची दशा करिल ती तव जन्माची।
जगन्नाथ-रथ-चक्रा खालीं, क्षणार्धांत प्राणांत होईल।
परि जीवन कवि भार्येचे तें आमरणांत ताप देईल।

**पद्मा.** :
जाऊ कुठे सोडुनि हें दिव्य चरण, पुण्य धाम पावन। मग जाऊं कुठें?
जन्मांतरिचें संचित आज सफल झाले, सेवा याच पदांची,
मानी मी सकल काम साधनें॥

**जय.** :
असें सर्वथा मी अकिंचन।

**पद्मा.** :
चिंता किंचित न करि मम मन। गमे अकिंचनता मजला, कविचें भूषण।

**जय.** :
कवि ना मानी कसलें बंधन।

**पद्मा.** :
जीवन सार्थ करीन, करोनी याच पदांचे निशिदिनीं चिंतन।

**जय.** :
रूप-शील-गुण शाली, अमुख सेवण्या सजली।
पाश गहन विधि घाली कोण तयातें वारीं॥

**पद्मा.** :
सेवायुत प्रेमयाशीं, बांधिन मी आपणासी।
काव्यातें छंद जैसे, सुंदरता देई।



**जय.** :
बंदिवान तव रूप गुणांचा जाहलो पुरा मी जन्माचा।
स्वीकारुनि हा दास सुंदरी पूर्ण करी संकल्प पित्याचा।

**पद्मा.** :
धन्य, धन्य मी हाचि असे क्षण मम अनुपम भाग्याचा साचा।
जाऊं उभयतां प्रसाद घेऊं जगन्नाथ पद पंकजाचा। प्रेमसाक्षी परमेशाचा॥
(जाऊं लागतात, सेवकाना घेऊन श्रेष्ठी येतो)

**श्रेष्ठी** :
ऐकला लपुनि मी उभयांचा वाङ्‌निश्चय धर्मद्रोही।
प्रभूची दासी प्रभू सेवेशी, मानव पत्नी हो नच कधिही।

**पद्मा.** :
प्रभूची नोहे सेवा तुमची कामी नर-पशू कुजनांची।
नका धरूं वासना वृथा ती दासी मी पति-चरणांची।

**जय.** : जगन्नाथ दृष्टांत बलें हे पुष्प शिरावरिं मी धरिले।
शिरच्छेद जरी माझा झाला पहाल तें तेथेंच राहिलें
वाङ्‌निश्चयही झाला आमुचा॥

**श्रेष्ठी** :
वाङ्‌निश्चित ही वधू म्हणसी परि, साक्षी कोण असें तयाला?

**जय.** :
तुम्हीच वदला स्वमुखाने कीं वाङ्‌निश्चय मी आयकिला॥

**श्रेष्ठी** :
नाहीं ऐकिला एक शब्द मी, ऐका आता अंतिम आज्ञा।
देवदासीपद झिडकारिल जरि पद्मावति रथ-चक्रा खालीं।
निश्चयें तरि चूर्ण होईल पाहू कोण मग तिजला वाली।

**जय.** :
सत्तांध, पापकूप, कुविचारी, अनाचार प्रकृतीच तुमची।
सुविचार नसे, कुविचारी मन अत्याचार नित्य कृति साची॥

**श्रेष्ठी** :
जगन्नाथ मंदिर श्रेष्ठी मी गालि-प्रदान करिसी मजला।
रथचक्रावरी पद्मावतिसह जाशिल तूंहि यमसदनाला।

**जय.** :
हाचि हेतु निज मानसि धरुनि कुवचें विटाळलें वाचेतें।

**श्रेष्ठी** :
जा इथुनि ना तरि भोगशील तूही दारुण शासनातें।

**जय.** :
पद्मावतीसह बद्ध करुनि मज, करा एक तरि पुण्य कर्म तें ।

**पद्मा.** :
अहाहा, पार नसे या मम भाग्याला । मम कारण निज जीव वेंचण्या, सिद्ध होत पती ।
अन्य मोक्ष मग असे कोणता तो सतीला ॥

**श्रेष्ठी** :
न हो कदापि ऐसे, छिन्नविच्छिन्न पद्मावति पाहुनि
भोगण्या सतत अनिवारशा यातना, भ्रष्ट मति होउनि, अवनिवरी भटकण्या
राही जिवंत आगुंतका वंचका ॥
पद्मावति, सारासार विचार करी देवदासी पद धिःकारुनि जरि
क्षुद्र मानवा मागुति जाशी, होशील पात्र निश्चयें तरि,
घोर मृत्युच्या शासनासी ॥

**पद्मा.** :
जाया ही जयदेव कविची, होइल का कधिं देवदासी ?
मृत्यु गमे मज शतपट बरवा बांधा मज रथ-चक्रासी ।

**श्रेष्ठी** :
दंडधारी सेवकहो, न्यायमंदिरा पित्यासवें न्या अपराधी पद्मा ।

**दंडधारी** :
चल गे दासी, निमुटपणे चल न्यायमंदिरा

**पद्मा.** :
लावूं या चरणधूलीं भालीं मज, सौभाग्यतिलक हाचि लाभो, मज जन्मांतरि,
( दंडधारी पद्मावतीस फरफटत नेतो. )

**जय.** :
जगनाथ, करुणानिधाना, केवि बसला मिटोनि नयना !
मान्य कां प्रभो अंत नीतिचा, एकनिष्ठ संतत सेवेचा
पामरा आम्हां नकळे साचा हेतू आपुला कृपाविताना ॥

[ अंक १ ला समाप्त ]

PANDIT CENTRE FOR FUNDAMENTAL RESEARCH IN INDIAN THEATRE

## अंक २ रा

( रथयात्रा, लोकांचा कल्लोळ, अनेक वाद्यांचा आवाज. पद्मावती व विष्णुशर्मा यांना बांधून आणले आहे. )

**श्रेष्ठी** :
नाथपुरिचे सकल भक्तजन, ऐका, ऐका करुनि शांत मन. [गोंगाट थांबतो]
जगन्नाथ-संस्थान श्रेष्ठी महाजनांचा निर्णय ऐका ।
देवदासी-पद धिःकारोनी पद्मावतीने प्रभूरायाची ।
केलि अवज्ञा, यास्तव तिजला दिधली शिक्षा देहांताची ।

**नागरिक** :
काय ! देहांताची ! देहांताची !

**श्रेष्ठी** :
संमति दाता पिता तिचा की म्हणुनि विष्णुशर्म्यासी ।
तिच्यासवे हो बद्ध करावे प्रभू-जगन्नाथ रथ-चक्रासी ।

**नागरिक** :
न्याय नव्हे अन्याय, अन्याय ।

**श्रेष्ठी** :
महाजनमुखे दिधली आज्ञा प्रभूरायानें—

**विष्णु.** :
प्रभूरायाचें नांव कशाला वेसि अमंगलशा मुखानें ।

**पद्मा.** :
अपराध दिसे जो तुमच्या स्वार्था, मानी मी त्या भाग्य सर्वथा ।
दुःख हेंचि कीं शासुनि मजला लांछन देता जगन्नाथा ।

**विष्णु.** :
न्या उभयांना जखडा महारथाच्या चक्रा—
कुठे असे तो जयदेव कवी ?

**जय.** :
हा मी येथे समीप आहे राक्षसलीला महाजनांच्या पहात अवघ्या राहे ।

**श्रेष्ठी** :
पहाणे अजुनि पुढेच आहे—

**महाजन** :
काय अमुचा महाजनांचा उपमर्द कराया तू धजसी ।

**२ रा महा.** :
कवि माजला, न्या त्यालाही बद्ध करा रथ-चक्रासी ।